महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ५७४ दिनांक ०७/०९/२०१८

**विषय :** सांघिक कार्यालय व क्षेत्रिय कार्यालय येथे कार्यरत जनसंपर्क अधिकारी यांना वृत्तपत्र खरेदीकरिता व छायाचित्र काढण्याकरिता विहित केलेल्या खर्चाच्या मर्यादेमध्ये वाढ करणेबाबत.

........

कंपनीतील उप मुख्य जनसंपर्क अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी, परिमंडल कार्यालय यांना वृत्तपत्र खरेदीकरिता प्रशासकीय परिपत्रक क्र. ४५४ दि. ०३/०४/२०१३ नुसार रु. २४,०००/- प्रति वर्ष व जनसंपर्क विभागातील अधिकारी यांना छायाचित्रांच्या खर्चाकरिता प्रशासकीय परिपत्रक क्र. २९ दि. २९/०३/२००६ नुसार रु. १,५००/- प्रति कार्यक्रम एवढया रकमेच्या मर्यादेपर्यंत खर्च करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

२. सद्यस्थितीत बदलत्या काळानुसार जनसंपर्क विभागाच्या कार्यपध्दतीमध्ये होत असलेला/ झालेला बदल तसेच विविध प्रसारमाध्यमांचे वाढते महत्व विचारात घेऊन सांघिक कार्यालय तसेच क्षेत्रिय कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी यांना विविध माध्यमांमध्ये कंपनीच्या संदर्भात प्रसारीत होणारे वृत्त/ लेख याबाबत विनाविलंब अवलोकित करणे आवश्यक असते. या अनुषंगाने मागील कालावधीतील वृतपत्रांच्या किंमतीत झालेली वाढ व कंपनीच्या विविध कार्यक्रमांकरिता छायाचित्रासाठी होणारा खर्च विचारात घेऊन उपरोक्त नमूद खर्चाच्या मर्यादेमध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

३. आता, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि कार्यकारी संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन उपरोल्लेखीत खर्च मर्यादा वाढविण्याकरिता खालीलप्रमाणे मंजुरी प्रदान केलेली आहे.

(क) वृत्तपत्र खरेदीसाठी रु. ३५,०००/- प्रति वर्ष

(ख) कार्यक्रम छायाचित्रांकरिता

| | | | |
|---|---|---|---|
| i) | महत्वाचे राष्ट्रीय/शासकीय कार्यक्रम (मुख्यालय, पुणे, नागपूर, औरंगाबाद, कल्याण, नाशिक व अमरावती या परिमंडळांसाठी) | - | प्रति कार्यक्रम रु. ३ हजार मात्र (वार्षिक मर्यादा ३६ हजार) |
| ii) | उर्वरित परिमंडळांसाठी | - | प्रति कार्यक्रम रु. २ हजार मात्र (वार्षिक मर्यादा २४ हजार) |

४. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेच्या तारखेपासून अंमलात येईल.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

Circular of CIRO.docxC:\Users\ADMIN\Desktop\Circular of CIRO.docx